53 61

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

राष्ट्रीय सेवा योजना व

# कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,गडहिंग्लज

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवशीय ऑनलाईन कार्यशाळा

# ''अवयवदान काळाची गरज''

दिनांक : १३/८/२०२० वेळ दुपारी २:०० ते ४:५०

## अहवाल (Report)

**प्रस्तावना :** जागतीक अवयवदान दिनाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर राष्ट्रीय सेवा योजना व कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज यांच्या संयुक्त विद्यमाने **गुरूवार दिनांक १३ ऑगस्ट २०२० रोजी '' अवयवदान काळाची गरज ''** या विषयावर विद्यापीठस्तरीय एक दिवशीय ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे मा. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. तर प्रमुख वक्ते म्हणून दी फेडरेशन ऑफ ऑर्गन ॲन्ड बॉडी डोनेशन, मुबई चे कोल्हापूर जिल्हा समन्वयक मा. योगेश अग्रवाल यांनी ''अवयवदान काळाची गरज'' या विषयावर मार्गदर्शन केले. ओंकार शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज चे प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली ही कार्यशाळा संपन्न झाली. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर राष्ट्रीय सेवा योजना संचलक मा. अभय जायभाये यांनी प्रास्ताविक केले तर कार्यशाळा समन्वयक तथा कोल्हापूर जिल्हा समन्वयक प्रा. डी. जी. चिघळीकर यांनी सुत्रसंचलन व आभार व्यक्त केले. सदर कार्यशाळेत शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्हयातील सर्व कार्यक्रम अधिकारी व आयोजक महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्वंयसेवक यांनी कार्यशाळेत सक्रीय सहभाग घेतला. संख्या 65

## मान्यवरांनी व्यक्त केलेले मनोगत

**मा. अभय जायभाये:** आपल्या प्रास्ताविकाच्या माध्यमातून कार्यशाळा आयोजनाच्या पाठीमागची भूमीका व्यक्त करून १३ ते १९ ऑगस्ट या कालावधीत ''महाअवयवदान सप्ताह साजरा करण्याची सूचना केली.

**मा.डॉ. विलास नांदवडेकर:** आपल्या उद्घाटनपर भाषणात म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने ज्या पध्दतीने मुली वाचवा मुली जगवा उपक्रमाची जन जागृती केली गेली त्याच पध्दतीने उवयवदान उपक्रमाची जनजागृती होणे गरजेचे आहे. प्रत्येक महाविद्यालयाने किमान १० लोकांची

ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE Reg.No. 2/12883 Estd. June - 1998 Tal.Gadhinglaj. Dist.Kolhapur. GADHINGLAJ

मानसिकता बदलून अवयवदान सहमती फॉर्म भरून घेण्यासाठी कार्यक्रम अधिकाऱ्यांनी सातत्याने प्रयत्न केले पाहीजेत.

**मा. योगेश अग्रवाल:** ''अवयवदान काळाची गरज'' या विषयावर बोलताना म्हणाले की, अवयवदान, त्वचादान, नेत्रदान, आणि देहदान या चार वेगवेगळया संकल्पना आहेत. भारतीय संस्कृतीमध्ये दानाचे महत्व जास्त आहे. तरीही अवयवदानाकडे मात्र पूर्णपणे दुर्लक्ष केले जात आहे. रक्तदान हे श्रेष्ठदान असले तरी अवयवदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. भारताचा विचार करता तामीळनाडूचा अवयवदानात पहिला क्रमांक तर महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक लागतो भारतात दरवर्षी २ लाख किडणीची गरज असून फक्त ६ हजार किडण्या उपलब्ध होतात. ३० हजार लिव्हरची मागणी आहे परंतू फक्त १५००लिव्हर उपलब्ध होतात. ५ हजार हृदयांची गरज असून फक्त १०० हृदय उपलब्ध होतात. अशीच अवस्था देहदानाच्या बाबतीत आहे. देहदाना नंतर मानवी शरिराचा उपयोग मेडिकलच्या विदयार्थांना अभ्यासासाठी होत असतो. प्रत्येक १० विदयार्थांनच्या पाठिमागे एक बॉडी उपलब्ध होणे गरजेचे असते. ब्रिटनमध्ये हे प्रमाण १० विद्यार्थांना एक बॉडी तर भारतात मात्र ५० विद्यार्थांना एक बॉडी अभ्यासाठी मिळते ही शोकांतिका आहे. त्यामुळे अवयवदान, त्वचादान, नेत्रदान, आणि देहदानाची गरज लक्षात घेता आपल्या देहाला मृत्यू नंतर अग्णीदान किंवा मातीदान न करता गरजूनां जिवदान देण्यासाठी देहदानाचा संकल्प करावा.

**मा. डॉ. सुरेश चव्हाण:** अध्यक्षीय समारोपात बोलताना म्हणाले की, अवयवदानाची गरज लक्षात घेता या चळवळीची व्याप्ती वाढणे अत्यंत गरजेचे आहे. आणि या कार्यशाळेच्या माध्यमातून अवयवदानाची चळवळ अधिक गतीमान होण्यास निश्चीतच मदत होईल असा मला विश्वास वाटतो.

**डी. जी. चिघळीकर**
कार्यशाळा समन्वयक तथा
कोल्हापूर जिल्हा समन्वयक

**मा. अभय जायभाये**
संचालक, राष्ट्रीय सेवा योजना
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

राष्ट्रीय सेवा योजना
NATIONAL SERVICE SCHEME

I/C. PRINCIPAL
Arts, Commerce & Science College
Gadhinglaj, Dist. Kolhapur.

ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE
Reg.No. 2/12883
Estd. June - 1998
Tal.Gadhinglaj, Dist.Kolhapur.
GADHINGLAJ

दै. तरुण भारत दि. 18/08/2020

## महाविद्यालय स्तरावर अवयवदान जनजागृतीची गरज

**गडहिंग्लज :** राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून उपक्रमाची जनजागृती होणे गरजेचे आहे. महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्यांनि किमान १० लोकांना अवयवदानाचे महत्व पटवून देवून जनजागृती करून सहमतीचे पत्रे भरून घ्यावेत असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि येथील ओंकार शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक अवयवदान दिनानिमित्य व्हिसीद्वारे घेण्यात आलेल्या 'अवयवदान काळाजी गरज' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश चव्हाण होते. प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, दी फेडरेशन ऑफ ऑर्गन ॲन्ड बॉडी डोनेशन संस्थेचे जिल्हा समन्वयक योगेश अग्रवाल, संस्थेचे अध्यक्ष राजन पेडणेकर यांची प्रमूख उपस्थिती होती. यावेळी बोलताना योगेश अग्रलवा म्हणाले, अवयवदान, त्वचादान, नेत्रदान आणि देहदान या वेगवेगळ्या संकल्पना असून भारतीय संस्कृतीत दानाचे महत्व जास्त आहे. तरीही याकडे दुर्लक्ष होत आहे. देशात किडनी, लिव्हर, हृदय, नेत्रदान हे चळवळीतून जनजागृती करणे आवश्यक असल्याचे सांगितले. यावेळी अध्यक्षीय भाषण डॉ. सुरेश चव्हाण यांनी केले.

VSB / VSA

Kulkarni

ग्रंथपाल
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय
राजर्षी शाहू कनिष्ठ महाविद्यालय
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

Arts, Commerce & Science College
Rajarshi Shahu Jr College
LIBRARY
GADHINGLAJ

प्रभारी प्राचार्य
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर